RNI No. MAHBIL /2009/31748

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग एक—अ-मध्य उप-विभाग

वर्ष ७, अंक १५] गुरूवार, मे ६, २०२१/वैशाख १६, शके १९४३ [पृष्ठे ६, किंमत : रुपये २६.००

**असाधारण क्रमांक २३**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या, ग्रामपंचायती, नगरपरिषदा, प्राथमिक शिक्षण आणि स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम यांखालील (भाग चार-ब मध्ये प्रसिद्ध करण्यात आलेले आदेश व अधिसूचना यांव्यतिरिक्त) आदेश व अधिसूचना.**

**नगरविकास विभाग**

४था मजला, मंत्रालय, हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा रोड,
मुंबई ४०० ०३२, दिनांक ६ मे २०२१.

**अधिसूचना**

**महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५.**

क्र. एमयुएम-२०१८/प्र.क्र.४३१/नवि-१७.—ज्याअर्थी, महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ च्या कलम ३४१-A चे पोट-कलम (१), (१B) व (२) च्या तरतुदीं अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करून प्राथमिक उद्घोषणा, नगर विकास विभाग, क्रमांक एमयुएम-२०१८/प्र.क्र.४३१/नवि-१७, दिनांक २९ डिसेंबर २०२० (यापुढे याचा उल्लेख " उक्त उद्घोषणा " असा असेल) अन्वये उक्त उद्घोषणेद्वारे महाराष्ट्र शासनाने जळगाव जिल्ह्यातील नशिराबाद या ग्रामपंचायतीचे स्थानिक क्षेत्र हे संक्रमणात्मक क्षेत्र म्हणून विनिर्दिष्ट करून, या क्षेत्रासाठी " नशिराबाद नगरपंचायत " गठीत करण्याबाबतची अधिसूचना प्रसिध्द करण्याचा हेतू जाहीर केला होता ;

आणि, ज्याअर्थी, उक्त उद्घोषणा रद्द करणे शासनास योग्य वाटते.

आता, त्याअर्थी, महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ च्या कलम ३ च्या पोट-कलम (३) यासह कलम ३४१Aच्या पोट-कलम (१B) अन्वये तसेच महाराष्ट्र जनरल क्लॉजेस ॲक्ट (१९०४ चा I) मधील कलम-२१ अन्वये प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करुन, महाराष्ट्र शासन याद्वारे दिनांक २९ डिसेंबर २०२० रोजीची उक्त उद्घोषणा रद्द करीत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**कैलास बधान,**
शासनाचे उप सचिव.



भाग एक–अ (म.उ.वि.)-२३-१

## URBAN DEVELOPMENT DEPARTMENT

Mantralaya, Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk,
Mumbai 400 032, dated the 6th May 2021

*NOTIFICATION*

MAHARASHTRA MUNICIPAL COUNCILS, NAGAR PANCHAYATS AND INDUSTRIAL TOWNSHIPS ACT, 1965.

No. MUM 2018/CR.431/UD-17.—Whereas, by the Government Proclamation, Urban Development Department, No. MUM 2018/CR.431/UD-17, dated the 29th December 2020 (hereinafter referred to as "the said Proclamation"), the Government of Maharashtra had announced its intention to issue notification under sub-sections (*1*), (*1B*) and (*2*) of section 341A of the Maharashtra Municipal Councils, *Nagar Panchayats* and Industrial Townships Act, 1965 (Mah.XL of 1965), to specify the local area of the Village Panchayat Nashirabad in Jalgaon District, being an area in transition from rural area to an urban area and to constitute a *Nagar Panchayat* by the name of the Nashirabad *Nagar Panchayat* for the said transitional area ;

And whereas, the Government considers it expedient to rescind the said Proclamation ;

Now, therefore, in exercise of the powers conferred by sub sections (*1B*) of section 341A read with sub-section (*3*) of section 3 of the Maharashtra Municipal Councils, *Nagar Panchayats* and Industrial Townships Act, 1965 (Mah.XL of 1965) read with section 21 of the Maharashtra General Clauses Act (I of 1904), the Government of Maharashtra hereby rescinds the said Proclamation, dated the 29th December 2020.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

KAILAS BADHAN,
Deputy Secretary to Government.

**नगरविकास विभाग**

मंत्रालय, मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक,

मुंबई ४०० ०३२, दिनांक ६ मे २०२१.

**उद्घोषणा**

**महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५.**

क्रमांक एमयुएम-२०१८/प्र.क्र. ४३१/ नवि -१७.- महाराष्ट्र नगरपरिषद, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ (सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. ४०) (यात यापुढे ज्याचा उल्लेख " उक्त अधिनियम " असा करण्यात आला आहे.) याच्या कलम ३ चे पोट-कलम (३) च्या तरतुदीनुसार, महाराष्ट्र शासन याद्वारे, जळगाव जिल्ह्यातील नशिराबाद या ग्रामपंचायतीचे स्थानिक क्षेत्र हे लहान नागरी क्षेत्र म्हणून विनिर्दिष्ट करण्यासाठी आणि उक्त क्षेत्रासाठी " नशिराबाद नगरपरिषद " या नावाने नगरपरिषद गठीत करण्याच्या दृष्टीने, उक्त अधिनियमाचे कलम ३ चे पोट-कलम (२), (२A) आणि (३) याद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, अधिसूचना काढण्याचा आपला हेतू घोषित करीत आहे.

२. उक्त अधिसूचनेला कोणताही आक्षेप घेणाऱ्या व्यक्तीने ही उद्घोषणा **महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात** प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून तीस दिवसांच्या कालावधीत जिल्हाधिकारी, जळगाव, महाबळ रोड, नविन जोशी कॉलनी, प्रभात कॉलनी, जळगाव-४२५ ००१ यांच्याकडे लेखी आक्षेप कारणांसह सादर करणे आवश्यक असेल.

३. उक्त कालावधीमध्ये मिळालेल्या अशा कोणत्याही आक्षेपावर शासनाकडून विचार करण्यात येईल.

**नगरविकास विभाग**

मंत्रालय, मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक,

मुंबई ४०० ०३२, दिनांक ६ मे २०२१.

**प्रारुप अधिसूचना**

क्रमांक एमयुएम-२०१८/प्र.क्र. ४३१/ नवि -१७.- ज्याअर्थी, शासनाने महाराष्ट्र नगरपरिषद, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ (सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.४०) (यात यापुढे ज्यांचा उल्लेख " उक्त अधिनियम " असा करण्यात आला आहे.) च्या कलम ३ चे पोट-कलम (३) अन्वये प्रदान केलेल्या शक्तींच्या अधिन राहून, ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३ चे पोट-कलम (२), (२A) आणि (३) यांच्या तरतुदीनुसार, शासन उद्घोषणा, नगरविकास विभाग, क्र. एमयुएम २०१८/ प्र.क्र.४३१/नवि -१७, दिनांक ६ मे २०२१ (यात यापुढे ज्यांचा उल्लेख " उक्त उद्घोषणा " असा करण्यात आला आहे.) याद्वारे **महाराष्ट्र शासन असाधारण राजपत्र,** दिनांक ६ मे २०२१ यामध्ये उद्घोषणा प्रसिद्ध केली असून, शासनाने जळगाव जिल्ह्यातील नशिराबाद या ग्रामपंचायतीचे स्थानिक क्षेत्र, ग्रामीण क्षेत्रातून लहान नागरी क्षेत्र म्हणून विनिर्दीष्ट करण्याच्या आणि उक्त स्थानिक क्षेत्रासाठी " नशिराबाद नगरपरिषद " या नावाने नगरपरिषद गठीत करण्याच्या प्रस्तावावर आक्षेप मागविले आहेत ;

आणि ज्याअर्थी, उक्त शासन उद्घोषणा स्थानिक वर्तमान पत्रात प्रसिद्ध करण्यात आली आहे ;

आणि ज्याअर्थी, उक्त उद्घोषणेमध्ये नमूद कालावधीत जिल्हाधिकारी, जळगाव यांच्याकडे प्राप्त झालेल्या आक्षेप आणि सूचनांचा शासनाने विचार केला आहे ;

आणि ज्याअर्थी, भारताचे संविधानाच्या अनुछेद २४३-Q च्या खंड (२) मध्ये नमूद केलेल्या बाबी विचारात घेऊन महाराष्ट्र शासनाला, यासोबत जोडलेल्या अनुसूची "अ" मध्ये अधिक तपशीलवारपणे वर्णन केलेले उक्त स्थानिक क्षेत्र हे, लहान नागरी क्षेत्र म्हणून विनिर्दिष्ट करणे इष्ट वाटते ;

त्याअर्थी, आता, उक्त अधिनियमाच्या कलम ३ चे पोट-कलम (२), (२A) आणि (३) अन्वये प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून उक्त स्थानिक क्षेत्र हे, लहान नागरी क्षेत्र म्हणून विनिर्दिष्ट करीत असून, त्याकरीता उक्त अधिनियमाच्या कलम ३ चे पोट-कलम (२), (२A) आणि (३) मधील अधिकारांचा वापर करून, जळगाव जिल्ह्यातील नशिराबाद या ग्रामपंचायतीचे स्थानिक क्षेत्र, ग्रामीण क्षेत्रातून लहान नागरी क्षेत्र म्हणून विनिर्दिष्ट करून, उक्त स्थानिक क्षेत्रासाठी " नशिराबाद नगरपरिषद " या नावाने नगरपरिषद गठीत करण्यात येईल. उक्त लहान नागरी क्षेत्राच्या हद्दी यासोबत जोडलेल्या अनुसूची ' ब ' मध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे असतील.

**अनुसूची - ‘ अ ’**

**लहान नागरी क्षेत्र म्हणून विनिर्दिष्ट करावयाच्या स्थानिक क्षेत्राचे वर्णन**

नशिराबाद ग्रामपंचायतीत असलेले संपूर्ण क्षेत्र

**अनुसूची - ‘ ब ’**

**लहान नागरी क्षेत्र म्हणून विनिर्दिष्ट करावयाच्या स्थानिक क्षेत्राच्या हद्दीचा तपशील**

महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम ( १९५९ चा तीन ) अन्वये स्थापन केलेल्या नशिराबाद ग्रामपंचायतीच्या क्षेत्राची हद्द.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**कैलास बधान,**
शासनाचे उप सचिव.

## URBAN DEVELOPMENT DEPARTMENT

Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk,
Mantralaya, Mumbai 400 032, dated the 6th May, 2021

### *PROCLAMATION*

MAHARASHTRA MUNICIPAL COUNCILS, NAGAR PANCHAYATS AND INDUSTRIAL TOWNSHIPS ACT, 1965.

No. MUM-2018/C.R.431/UD-17.- In pursuance of the provisions of sub-section (*3*) of section 3 of the Maharashtra Municipal Councils, *Nagar Panchayats* and Industrial Townships Act, 1965 (Mah.XL of 1965) (hereinafter referred to as "the said Act"), the Government of Maharashtra hereby announces its intention to issue a notification, in exercise of the powers conferred by sub-sections (*2*), (*2A*) and (*3*) of section 3 of the said Act, with a view to specify the local area of the Village Panchayat Nashirabad in Jalgaon District, as a smaller urban area, and to constitute a Municipal Council by the name of the Nashirabad Municipal Council for the said smaller urban area.

2. Any person who entertains any objection to the said Proclamation is hereby required to submit the same in writing with the reasons therefor, to the Collector, District Jalgaon, Mahabal Road, New Joshi Colony, Prabhat Colony, Jalgaon - 425 001, within a period of thirty days from the date of publication of this Proclamation in the *Maharashtra Government Gazette.*

3. Any such objection which may be received during the said period will be considered by the Government.

## URBAN DEVELOPMENT DEPARTMENT

Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk,
Mantralaya, Mumbai 400 032, dated the 6th May, 2021.

### *DRAFT NOTIFICATION*

No. MUM-2018/C.R.431/UD-17.- Whereas, by the Government Proclamation, Urban Development Department, No.MUM-2018/ C.R.431/UD-17, dated the 6th May 2021, published in the *Maharashtra Government Gazette*, Part-I-A, Extraordinary, Central Division Supplement, dated the 6th May 2021( hereinafter referred to as "the said Proclamation"), issued in pursuance of the provisions of sub- sub-section (*3*) of section 3 of the Maharashtra Municipal Councils, Nagar *Panchayats* and Industrial Townships Act, 1965 (Mah. XL of 1965) (hereinafter referred to as "the said Act"), the Government of Maharashtra has invited objections to its proposal to issue a notification under sub-sections (*2*), (*2A*) and (*3*) of section 3 of the said Act, to specify the local area of the Village Panchayat of Nashirabad in Jalgaon District, being a smaller urban area and to constitute a Municipal Council by the name of "the Nashirabad Municipal Council" for the said smaller urban area ;

And whereas, the said Proclamation was published in the local newspaper ;

And whereas, the objections and suggestions so received by the Collector of Jalgaon District, pursuant to the said Proclamation have been duly considered by the Government of Maharashtra;

And whereas, having regard to the factors mentioned in clause (*2*) of article 243-Q of the Constitution of India, the Government of Maharashtra considers it expedient to specify the said local area, more particularly described in Schedule 'A' appended hereto, to be a smaller urban area ;

Now, therefore, in exercise of the powers conferred by sub-sections (*2*), (*2A*) and (*3*) of section 3 of the said Act, and of all other powers enabling it in that behalf, the Government of Maharashtra hereby specifies the said local area to be a smaller urban area for which there shall be constituted a Municipal Council as provided in sub-sections (*2*), (*2A*) and (*3*) of section 3 of the said Act, by the name of "the Nashirabad Municipal Council". The boundaries of the said smaller urban area shall be such as are specified in Schedule 'B' appended hereto.

*SCHEDULE ' A'*

**Description of the Local Area to be specified as a smaller urban area**

The whole area of the Village Panchyat of Nashirabad

*SCHEDULE 'B'*

**Boundaries of the Local area to be specified as a smaller urban area**

Boundaries of the area of the Village Panchyat of Nashirabad constituted under the Maharashtra Village Panchyat Act (III of 1959 )

By order and in the name of the Governor of Maharashtra,

KAILAS BADHAN,
Deputy Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.